**सोलापूर महानगरपालिका**
**प्रशासक ठराव**
**(मा.स्थायी समिती संदर्भ)**
**विषय क्र.१२ ठराव क्र.१२ दिनांक ०४/०५/२०२३**

१२

मनपा शाळा क्र.६ येथे कामगार कल्याण विभागाकडील दिव्यांग सहाय्य योजनेतून भौतिक उपचार केंद्र स्थापन करणेत आलेले असून ते आजला कार्यरत आहे. सोलापूर शहरातील दिव्यांग बाधीत स्त्री, पुरुष आर्थिकदृष्टया घटकातील लाभार्थ्यांना त्याचा लाभ होणार असल्याने, उपचारासाठी आलेल्या दिव्यांग व्यक्तींना मोफत उपचार करणेत येणार आहे. परंतू शहरातील इतर सर्वसाधारण नागरिकांना उपचार घेण्यासाठी दर आकारावे लागणार आहे. त्यातून मनपाला आर्थिक लाभ होणार आहे.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे दि.२८/१२/२०१५ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील शासकिय रुग्णालयामधून देण्यात येणाऱ्या तपासणी व त्याबाबतच्य रुग्णशुल्काबाबत शासन निर्णय पारित झाला आहे. त्यामध्ये पान क्र.७२ व ७३ मध्ये उभारणेत आलेल्या भौतिक उपचार केंद्रासाठी रुग्णशुल्क आकारणेत आले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | रुग्णसेवा/सुविधा | रुग्ण शुल्क |
|---|---|---|
| 1 | हॉट व्हेव डायाथर्मी | 30.00 |
| 2 | मायक्रोवेव्ह थेरपी | 30.00 |
| 3 | इन्फ्रा रेड | 20.00 |
| 4 | इंटरफेरंशीयल / मल्टीकरंट थेरपी | 30.00 |
| 5 | अल्ट्रासोनिक | 30.00 |
| 6 | पॅराफीन व्हॅक्स बाथ | 20.00 |
| 7 | हायड्रोबबलर बाथ | 30.00 |
| 8 | अल्ट्राव्हायोलेट रेज | 30.00 |
| 9 | लेसर थेरपी | 30.00 |
| 10 | सरव्हायकल/पेलव्हीक ट्रॅक्शन | 30.00 |
| 11 | सी.पी.एम.शोल्डर/नी जॉईंट | 30.00 |
| 12 | एक्झरसाईज मॅन्युअल किंवा उपकरण मदतीने | 30.00 |
| 13 | छातीची फिजीओथेरपी | 20.00 |
| 14 | इलेक्ट्रो थेरपी व एक्झरसाईज – कोणतेही एक मोडॅलिटी | 60.00 |
| 15 | इलेक्ट्रो थेरपी व एक्झरसाईज – कोणतेही दोन मोडॅलिटी | 80.00 |
| 16 | एक्झरसाईज (फक्त) | 30.00 |



ed from eOffice by RAGHU NAGESH MANDALLOU, SMC-JR CLERK(RNM)-HEALTH, JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION

| | | |
|---|---|---|
| 17 | इलेक्ट्रीकल स्टीम्युलेशन (फक्त) | 30.00 |
| 18 | हायड्रोथेरपी | 30.00 |
| 19 | फिजीओथेरपी प्रत्येक सिटींगसाठी | 20.00 |

नमूद तक्त्यातील शुल्क आकारणी करणेकामी मा.मनपाचे धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे यानुसार प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक आहे परंतू मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **धोरणात्मक निर्णयास्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२६/०४/२०२३ ने आलेले **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
मा.प्रशासक कार्यालय

(शीतल तेली - उगले, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका